# पुस्तकांचे गाव - भिलार




## क्षेत्रीय-- भेट (एक अविस्मरणीय सहल)




"पुस्तकांचे गाव, हा प्रकल्प खरा आश्चर्यकारक! महाराष्ट्र शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने पुस्तकांचे गाव हा प्रकल्प पाचगणी ते महाबळेश्वर या पासून ५ km अंतरावर भिलार या गावांत राबवण्यात येत आहे. भारतातला हा एकमेव प्रकल्प. ४ मे २०१७ रोजी माजी सांस्कृतिक व विकास मंत्री श्री. विनोद तावडे यांनी ब्रिटन इथल्या "Hay on Wye" (Notable well known for its books store) याची प्रकल्पना घेऊन हे पुस्तकांचे गाव ही अद्भुत प्रकल्पना भिलार येथे सुरु केली. याचे उद्घाटन श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

जवळपास ३५ घरांच्या पडवीत असलेल्या या पुस्तकांच्या संग्रहालयात ४०,००० वर जास्त पुस्तकांचा साठा आहे. मराठी भाषेतली सर्व पुस्तक येथे आहेत.

"इथे या, पुस्तके हाताळा, चाळा आणि वाचा"

होतकरू वाचकांनी, पुस्तकप्रेमींनी भिलारमध्ये येऊन आपल्या आवडत्या साहित्यप्रकारच्या दालनात बसून दोन टप्प्यात सलग आठ ते दहा तास वाचन करणे, अशी ह्या उपक्रमाची संकल्पना आहे.

अशाच पुस्तकांच्या गावाला भिलार येथे भेट देण्याचा अनुभव नुकताच यशदा प्रशिक्षणाच्या निमित्ताने आला. आम्हाला दिवाळी अंक हे दालन देण्यात आले होते. दिवाळी अंक चाळतांना एका अंकानी अचानक माझे लक्ष वेधलं "दिवाळी 2023, सृजनसंवाद घर विशेषांक"!

पुस्तकाचे गाव - भिलार, या गावाचे वैशिष्ट्य घर. इथल्या नागरिकांनी प्रत्येकी एक, अशी आपल्या घरातली जमेल तेवढी जागा पुस्तकं संग्रहालयासाठी दिली. अगदी विनामूल्य "माणसातल्या माणुसकीचे जिवंत उदाहरण : माणुसकीचं घरच म्हणूया याला आपण!

मी चाळलेलं ते घर: अतिशय दमदार, मराठी संस्कृतीनी नटलेले, तुळशी वृंदावनाच्या आशीर्वादाने सजलेलं.

पुस्तकाचे संपादक: गीतेश शिंदे, प्रकाशक सौ. सोनाली शिंदे. अंकाची सुरवातच विविध कथाकथानांनी. त्याला साजेशी अशी कवितांची. खूप सुंदर गुंफलेल्या कविता.

वैशिष्ट म्हणजे यात प्रत्येक क्षेत्रातील घराणी, त्यांच्या संस्कृती व घरबांधणी याची उत्तमभूत माहिती विविध लेखकांनी प्रस्तुत केल्या आहेत. अगदी माणसापासून तर किटकांपर्यंत. उदाहरणात "यह घर बहोत हसीन है", "ब्रम्हांडातील नव घर", ~~[illegible]~~ "भारतीय शास्त्रीय संगीतातील घराणी", "घराची निर्मिती, रचना व त्यात हवामानानुसार होणारे बदल", "बंजारा संस्कृती: घर एक कल्पना", "पुराण, कथेतील घर", किटकांची आश्चर्यकारक दुनिया, घर पहावे बांधून. तसेच बसेरा तृतीयपंथाचा". या विविध विषयांवर प्रकाश टाकलेला आहे. ज्ञानेश्वरांच्या ओळी "हे विश्वची माझे घर" या वरील लेख अतिशय सुंदर.

"स्नेहवन" माझं हक्काचं घर, महान अनाथ व वृद्धांच्या घरासंबंधी या लेख, अप्रतिम लेखन, "घर घर असतं".

परत एक पण अत्यंत महत्वाचे, बाईपणं जपणारे स्वयंपाकघर-आत्मा घराच्या, सुखी संसाराचा. एक लेख Floating House केरळमधल्या घराबद्दलचा

आणि एक पुस्तकांच्या घरावरही! जे सह्याद्रीतील भिलार येथे अस्तित्वात आहे. पुस्तकांच गाव म्हणजे शेवटी आहे तरी काय? खूप साऱ्या पुस्तकांच्या घरापासूनं बनलेलच ना.

"काही पंक्ती लिहाव्यास वाटतात!

एकतरी स्वतःच घर असावं
तोडकं मोडकं पण ते आपलं असावं
घर शिकण्याची पहिली शाळा
घरात हवा जिव्हाळा
घर शिकवते जगायला
दुःखाचा डोंगर चढायला

घर एक इवलस, सुगरणीने विणलेलं
पिंपरिच्या संघ फांद्यावर टांगलेलं
घर एक इवलंस अखंड तेज लेपलेलं
चिवचिवणाऱ्या चोचीत, रोज एक दाणा ठेवलेलं
~~घर पुस्तकांच पण असावं, साहित्याने नटलेलं~~
पुस्तकांच्या घरात पण गावं असावं, मिळार ~~साख्य~~!



डॉ. शितल मधुकरराव दलाल
सहयोगी प्राध्यापक
बधिरीकरणशास्त्र
इं. गा. शा. वै. मा व रु, नागपूर

"महाबळेश्वर", भिलार, वाई" एक अविस्मरणीय प्रवास"

सहल एक निमित्त
धकाधकीतून निघण्यासाठी...
सहल एक विरंगुळा
व्यापात गुंतलेल्यांसाठी...
सहल एक विश्रांती
शरीरासोबत मनाचीही...
सहल एक मनसोक्त संधी
परत आपणांसाठी जगण्याची...
दिली आम्हाला यशदाने
उम्मीद परत हसण्या बागडण्याची !

शनिवार दि. २०/७/२४ चा सुर्योदय यशदाच्या प्रशिक्षणार्थींसाठी नवी दिशा, नवे जगणे घेऊन आला. सकाळी ६:०० वाजताच्या चहाची चव काही औरच होती. Face biometric करून सर्वजण यशदाच्या बस मध्ये विराजमान झाले. आज प्रत्येकांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसून आला. selfie आणि फोटोची जणूकाही चढाओढच लागलेली. बस चालत गेली व आम्ही गाण्याच्या मैफिलीत वाहत गेलो. मध्येच एका वेगळ्या रेस्टारंट मध्ये सर्वांनी चवीष्ट नास्ता व चहा याचा आस्वाद घेतला.

गर्द झाडी, आडवळणी वाट, निसर्गरम्य वाटेवरून आमचे स्वप्न महाबळेश्वरकडे धावू लागले. जून्या आठवणी जाग्या झाल्या. त्याची इवलाशी लाली कोणाच्या गालांवर झळकू लागली.

महाबळेश्वर येथे वेण्णा तलावावर सर्वांनी मनोसक्त नौकाविहार केला. पाणी एकदम निळं तसेच तिथे असलेल्या कुळाचा स्वादही काही औरच. परत एकदा बालपण व तरूणपण जगणे काय असते याचा साक्षात अनुभव. नंतर आमची पावलं "भिलार - पुस्तकांचं गाव" या कडे वळली.

पुस्तकांचे गाव कस सुरू झालं, त्याची कार्यपद्धती, आकारणी याबाबत इत्थंभूत माहिती देण्यात आली व गटविभाजन करून विविध दालनात पाठवण्यात आले. त्यानुसार प्रत्येकाने भेट देऊन आपल्याला आवडेल असे पुस्तक निवडले व वाचले.

तदनंतर उदरभरण एकदम भारतीय सांस्कृतीक पद्धतीने झाले. परतीच्या प्रवासात मेणवली येथे नाना फडणवीसांच्या वाड्याचे दर्शन घेतले. त्यावेळची वाड्याची रचना, आकृती तसेच त्यांच्या कार्यपद्धती याचे यथायोग्य अवलोकन केल्या गेले. महाराष्ट्रीयन जेवणावरील पात्र वाढायची पद्धत नाना फडणवीसांनी आणली हे त्यादिवशी कळाले.

तिथून वाई येथील गणेशाचे दर्शन घेतले. गणरायाला साष्टांग

नमस्कार करून आमची बस "Mapro" येथे परत विसावली. सर्वांनी तिथल्या वस्तूंचा आस्वाद तर घेतलाच पण आप्तेष्टांसाठी खरेदीही केली.

मग वापस यशदाकडे बसने धाव घेतली!



डॉ. शितल मधुकरराव दलाल
सहयोगी प्राध्यापक
बधिरीकरणशास्त्र